पुढारी

# प्रौढांच्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेस प्रारंभ

## लक्ष मास्टर्स फाउंडेशनतर्फे आयोजन; २०० स्पर्धकांचा सहभाग

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सिथेंटिक ट्रॅकवर रविवारी प्रौढांच्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेस रविवारपासून प्रारंभ झाला. लक्ष मास्टर्स फाऊंडेशन, कोल्हापूर यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत २०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे.

शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी 'लक्ष'च्या अध्यक्षा संयुक्ता जाधव, ट्रस्टी कृष्णा शेट्टी, उपाध्यक्ष अभिजित मस्कर, डॉ. शैलजा डुणुंग, डॉ. निंबाळकर, विनोद कांबोज, सुनील शेंडगे, नासर खान आदी मान्यवर उपस्थित होते.



**कोल्हापूर : प्रौढांच्या मैदानी स्पर्धेचे क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून उद्घाटन करताना डॉ. प्रकाश गायकवाड. सोबत संयुक्ता जाधव, सुनील शेंडगे, नासर खान, कृष्णा शेट्टी, अभिजित मस्कर. (छाया : तय्यब अली)**

या स्पर्धेत ३५ ते १०० वयोगटातील महिला व पुरुषांनी सहभाग घेतला आहे. पहिल्या दिवशी उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक, भालाफेक अशा प्रकारात या स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेतील ३५ खेळाडूंची सांगली येथे २७ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सहभागी स्पर्धकांना फाऊंडेशनतर्फे टी शर्ट, मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# लुधियाना, नांदेड, सिमला, हरियाणा, दिल्ली विजयी

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी - २०' क्रिकेट स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दोन व राजाराम कॉलेजच्या एका मैदानावर सकाळ व दुपारच्या सत्रात सुरू असलेल्या 'कुलगुरू चषक टी-२०' क्रिकेट स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यांमध्ये लुधियाना, नांदेड, सिमला, हरियाणा, पतियाळा व दिल्ली संघाने प्रतिस्पर्धी संघावर मात केली.

**लुधियानाचा जम्मूवर ६ विकेटने विजय**

शिवाजी विद्यापीठाच्या मैदान नंबर एकवर रविवारी सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात शेरे काश्मीर विद्यापीठ जम्मूने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात सर्वबाद १०१ धावा केल्या. यामध्ये धीरज मनहासने ४१, विनोदकुमार २४ धावांची खेळी केली. उत्तरादाखल खेळताना लुधियाना संघाने हे लक्ष अवघ्या १२.५ षटकात ४ बाद १०२ धावा करून सामना जिंकला. यामध्ये समरजित सिंहने ६५ धावा करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. सामनावीर बहुमान लुधियानाच्या गुरूइकबालने पटकविला.

**नांदेडचा गोरखपूरवर ८ विकेटने मात**

दुपारच्या सत्रात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दिनदयाळ उपाध्ये विद्यापीठ गोरखपूरने १६.५ षटकात सर्वबाद ९७ धावा केल्या, यामध्ये सुरेंद्र यादव २५, रवी वर्मा १६ धावांची खेळी केली. उत्तरादाखल खेळताना नांदेड संघाने हे लक्ष अवघ्या १२.२ षटकात २ बाद १०१ धावा करून सामन्यात विजय संपादन केला. यामध्ये अजमेर बिडालने नाबाद ३० तर नरसिंह उगाडेने ३९ धावांची खेळी करून संघाला विजय मिळवून दिला.

**हिमाचल सिमलाचा नागपूरवर ७३ धावांनी विजय**

शिवाजी विद्यापीठाच्या (ॲथलॅटीक मैदान) वर रविवारी सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना हिमाचल विद्यापीठ सिमलाने २० षटकात ८ बाद १६९ धावांचा डोंगर उभारला. यामध्ये राजेश चव्हाणने ७८ तर मुकेशकुमारने ३७ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या उभारण्यात मोलाचे योगदान दिले. उत्तरादाखल खेळताना नागपूरचा डाव १८.५ षटकात सर्वबाद ९६ धावात गुंडाळला. यामध्ये रितेश पुरकमने ३२ तर निलेश शेटकेने २७ धावांची खेळी केली. सिमलाकडून गोलंदाजी करताना सुरेंद्रसिंह वर्मने ४ बळी तर मुकेशकुमारने २ बळी घेतले. सामनावीर बहुमान सिमलाच्या राजेश चव्हाणला देण्यात आला.



**हरीयाणाचा जम्मूवर २३४ धावांनी विजय**

दुपारच्या सत्रात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना लाला लजपतराय विद्यापीठ हरीयाणाने २० षटकात ३ बाद २८८ धावा केल्या. यामध्ये अनिलकुमारने ५६ चेंडूत १४१ धावांची शतकी खेळी तर विकास ठाकूरने ३३ चेंडूत ७२ धावांची अर्धशतकी केली. उत्तरादाखल खेळताना सेंट्रल युनिव्हर्सिटी जम्मू संघाचा डाव १३ षटकात सर्वबाद अवघ्या ५४ धावांत गडगडला. यामध्ये सुधाकर आर व असिफ अली यांनी प्रत्येकी १७ धावा केल्या. हरीयाणाकडून गोलंदाजी करताना सदबीर शर्माने ५ बळी घेऊन अर्धा संघ गारद केला.

**पतियाळाचा अकोल्यावर ८ विकेटने मात**

राजाराम कॉलेज मैदान नंबर तीनवर रविवारी सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पंजाबराव देशमुख विद्यापीठ अकोलाने १९.२ षटकात सर्वबाद ९३ धावा केल्या. यामध्ये जगदीश परमार १९, विरज सातपूते २६ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना पतियाळा संघाने हे लक्ष १२ षटकात २ विकेटच्या मोबदल्यात ९४ धावा करून विजय संपादन केला.

**दिल्लीचा जळगांववर ८ विकेटने विजय**

दुपारच्या सत्रात झालेल्या सामन्यात कवयत्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ जळगावने २० षटकात ७ बाद ८४ धावा केल्या. यामध्ये शशिकांत शिरसाटने २८ तर अरविंद गिरनारने २६ धावांची खेळी केली. जामिया विद्यापीठ दिल्लीकडून गोलंदाजी करताना महंम्मद अकलाकने ८ धावात ३ बळी तर सरफराज मसूदने २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना जामिया विद्यापीठ दिल्लीने हे लक्ष अवघ्या ९.२ षटकात २ बाद ८५ धावा करून सामन्यात विजय संपादन केला. यामध्ये महंम्मद वाईद २४, महोम्मद युसूफ नाबाद १८ तर साद करीमीने नाबाद ३० धावा केल्या. सामनावीरचा बहुमान महंम्मद अकलाकने पटकविला.